

# ज्ञानपर्व

## भारतीय ज्ञान परंपरा


**संपादक**

डॉ. सचिन कंदले

**सहसंपादक**

प्रा.डॉ. सर्जेराव जीगे

प्रा.डॉ. रमेश चौगुले

डॉ. विनोदकुमार वायचळ

प्रा. आनंद रत्नपारखे




# ज्ञानपर्व

## भारतीय ज्ञान परंपरा


**संपादक**

**डॉ. सचिन कंदले**
संस्कृत विभाग प्रमुख, स्वा.सावरकर महाविद्यालय, बीड
व अध्यक्ष, संस्कृत अभ्यास मंडळ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ सोलापूर.

**सहसंपादक**

**प्रा.डॉ. सर्जेराव जीगे**
अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर

**प्रा.डॉ. रमेश चौगुले**
अध्यक्ष, इंग्रजी अभ्यास मंडळ
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर

**डॉ. विनोदकुमार वायचळ**
हिंदी विभाग, श्री व्यंकटेश महाजन
महाविद्यालय, धाराशिव

**प्रा. आनंद रत्नपारखे**
संस्कृत विभाग, स्वा.सावरकर
महाविद्यालय, बीड



**एज्युकेशनल पब्लीशर्स**

# ज्ञानपर्व

## भारतीय ज्ञान परंपरा

**संपादक** : डॉ. सचिन कंदले

**सहसंपादक** : प्रा.डॉ. सर्जेराव जीगे, प्रा.डॉ. रमेश चौगुल
डॉ. विनोदकुमार वायचळ, प्रा. आनंद रत्नपारखे

**प्रकाशक** : *सागर पठाडे*
**एज्युकेशनल पब्लीशर्स ॲण्ड डीस्ट्रीबुटर्स**
गोकुळवाडी, संभाजीपेठ,
*छत्रपती संभाजीनगर -४३१००१*

**भ्रमणध्वनी क्र.** : ९४२१३०००३६, ९९७००६७९७१

**सर्व हक्क सुरक्षित:** © *लेखकाधिन.*

**आवृत्ती** : प्रथम आवृत्ती २०२५

**अक्षर जुळवणी** : *कीर्ती डीजीटल, छत्रपती संभाजीनगर*

**मुद्रण स्थळ** : महारुद्र ऑफसेट. MIDC Area,
*छत्रपती संभाजीनगर*

**किंमत** : रु २५०/-

ISBN: 978-93-48216-66-3

9 789348 216663

# अनुक्रमणिका


| अ.क्र | प्रकरणाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|
| १. | अत्याधुनिक व अद्ययावत भारतीय रक्षा तंत्रज्ञान<br>*- श्री काशीनाथ देवधर* | ७ |
| २. | प्राचीन भारतीय ज्ञान परंपरेत 18 विद्या व 64 कला<br>*- डॉ. क्रांती व्यवहारे* | २२ |
| ३. | भारतीय संत साहित्य : एक ज्ञान स्त्रोत<br>*- प्रा. डॉ. सर्जेराव जिगे* | ३५ |
| ४. | भारतीय ज्ञान परंपरेतील ज्ञान व विज्ञान (गणित, शून्य संकल्पना, खगोलशास्त्र, आयुर्वेद, शल्यचिकित्सा, धातुविज्ञान)<br>*- डॉ. सचिन चंद्रशेखर कंदले* | ४६ |
| ५. | भारतीय ज्ञान परंपरा आणि वैदिक खगोलशास्त्र (ज्योतिष / पंचांग / नक्षत्रविद्या)<br>*- प्रा. डॉ. विनोदकुमार विलासराव वायचळ* | ५९ |
| ६. | प्राचीन मंदिर निर्माण कला - प्रगत स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना<br>*- प्रो. डॉ. मीनल निमिष श्रीगिरीवार* | ६६ |
| ७. | भारतीय ज्ञान परंपरा व संगीतशास्त्र : एक वैज्ञानिक दृष्टीकोन<br>*- प्रा. आनंद दुष्यंतराव रत्नपारखे* | ८० |
| ८. | बौद्ध तत्त्वज्ञान : उत्पत्ती, स्वरूप व आधुनिक उपयोजन<br>*- डॉ. क्रांती व्यवहारे* | ९५ |
| ९. | भारतीय ज्ञानपरंपरेत संस्कृत व्याकरणाचे स्थान<br>*- प्रा.डॉ. अरुण चव्हाण* | १०४ |

# ५

# भारतीय ज्ञान परंपरा आणि वैदिक खगोलशास्त्र

## (ज्योतिष / पंचांग / नक्षत्रविद्या)

**प्रा. डॉ. विनोदकुमार विलासराव वायचळ**
सहायक प्राध्यापक,
हिंदी विभाग, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय,
धाराशिव – ४१३५०१ (महाराष्ट्र)

---

भारतीय ज्ञान परंपरेमध्ये प्रत्येक नित्य आणि नैमित्तिक यज्ञाच्या वेळी संकल्प पाठ करणे अनिवार्य असते. आज (प्रात: दि. २५ मार्च २०२५ आणि स्थान धाराशिव) अनुसार आजचा वैदिक संकल्प खालील प्रमाणे सांगता येईल.

ओ३म् तत्सत् श्री ब्रह्मणो द्वितीये परार्द्धे, श्री श्वेतवाराह कल्पे, वैवस्वत मन्वन्तरे, अष्टाविंशतितमे (२८) कलियुगे, कलि प्रथम चरणे, एको वृन्द, सप्तनवति कोट्य:, एकोनत्रिशंल्लक्षाणि, एकोनपञ्चाशत् सहस्राणि, सप्तविंशत्यधिकशततमे (१९७२९४९१२७) सृष्ट्यब्दे, पञ्च सहस्र अधिक एक शत सप्तविंशतितमे (५१२७) युगाब्दे, द्वयशीत्युत्तर द्विसहस्रतमे (२०८२) वैक्रमाब्दे, सप्तचत्वारिंशत अधिक एकोनविंशति (१९४७) शालिवाहन शके, एकोत्तर द्विशततमे (२०१) दयानन्दाब्दे,

परिवत्सर नाम वेदाङ्ग संवत्सरे, सिद्धार्थी नाम बार्हस्पत्य संवत्सरे, क्रोधी नाम संवत्सरे, कालयुक्त उत्तर संवत्सरे, उत्तरायणे, वसन्त ऋतौ, मासानां मासोत्तमे मधुमासे, पूर्णिमांत चैत्र मासे, अमावास्यांत फाल्गुन मासे, कृष्ण पक्षे, एकादशी तिथौ, मङ्गलवासरे, प्रात: काले, श्रवण चन्द्र नक्षत्रे, उत्तरभाद्रपदा सूर्य नक्षत्रे, मेष राशौ, मीन लग्नोदये, शिव योगे, बव-बालव करणे, शुभ मुहूर्ते, ब्रह्म, मनु, क्रतु, पुलस्त्य, अत्रि, अङ्गिरस, वशिष्ठ, मरीचि, विश्वमित्र, भरद्वाज, अगस्त्य, कपिल, पाणिनी, पतञ्जलि, गोतम, व्यास, जैमिनि, शङ्कराचार्य, दयानन्द सरस्वती प्रभृतिभिर्महर्षिभि: सेविते भूरादिसप्तलोकानामन्यतमे भूर्लोके, जम्बूद्वीपे, भारतवर्षे, भरतखण्डे, आर्यवर्तान्तर्गते पुण्य भूमौ महाराष्ट्र प्रान्ते, दण्डकारण्ये, मराठवाडा प्रदेशे, धाराशिव जनपदे, धाराशिव नगरे, भोगावती देव नद्यौर्तटे, कश्यप गोत्रोत्पन्न: वायचळ वंशज: विनायकरावस्य पौत्र: विलासरावस्य पुत्र: विनोदकुमार नामाहं विश्वकल्याणार्थ ब्रह्मयज्ञ:/ देवयज्ञ:/ पितृयज्ञ:/ अतिथियज्ञ:/ बलिवैश्वदेवयज्ञ: क्रियते |

वरील संकल्प मंत्राच्या आधारे कल्प, मन्वंतर, युग, चरण, अब्द, शके, संवत्सर, आयन, ऋतू, मास, पक्ष, तिथी, वार, काल, नक्षत्र, राशी, लग्न, योग, करण, मुहूर्त, ऋषी, भूलोक, द्वीप, वर्ष, खंड, देश, प्रांत, अरण्य, प्रदेश, जनपद, नगर या काल आणि स्थान आदींच्या संकल्पना अगदी सुस्पष्टपणे मांडल्या आहेत.

सध्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या निमित्ताने वरचे वर भारतीय ज्ञान परंपरेचा उल्लेख प्रत्येक विद्वत सभा-संमेलन-परिषद-चर्चासत्र-प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये होत असतो. भारतीय ज्ञान परंपरेचा मूळ उद्गम अर्थात वेद व वेदांग-उपांग यांचा उल्लेख केला जातो. भारतीय ज्ञान परंपरा आणि वैदिक खगोलशास्त्र या विषयावर कांही मत मांडण्याच्या आधी सहा वेदांगांपैकी ‘ ज्योतिष ’ बद्दल प्राथमिक माहिती असणे गरजेचे आहे.

छन्दः पादौ तु वेदस्य हस्तौ कल्पोऽथ पठ्यते।
**ज्योतिषामयनं चक्षु**र्निरुक्तं श्रोत्रमुच्यते ॥ ४१ ॥
शिक्षा घ्राणं तु वेदस्य मुखं व्याकरणं स्मृतम्।
तस्मात्साङ्गमधीत्यैव ब्रह्मलोके महीयते ॥ ४२ ॥

पाणिनीय शिक्षा या ग्रंथाच्या श्लोक संख्या ४१ व ४२ व्याख्येनुसार वेद पुरुषाची कर्मेंद्रिय - पाय छंद, हात कल्प, ज्ञानेंद्रिय - डोळे ज्योतिष, कान निरुक्त, नाक शिक्षा आणि मुख व्याकरण आहे. **ज्योतिषामयनम् चक्षु** म्हणजेच ‘ज्योतिष या

वेदांगाला वेदांचे डोळे' म्हटले जाते. मानवीय आयुष्यात जेवढे महत्व डोळ्यांना दिले जाते तेवढेच महत्व ज्योतिष या वेदांगाला द्यायला हवे.

आजचे ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्राबरोबरच पंचांग या नावाने सुद्धा ओळखले जाते. सौर, चांद्र, सायन, निरयन, नाक्षत्र आणि बार्हस्पत्य, जन पंचांगाची पाच अंगे अशी आहेत – १. ऋतू, २. चांद्रमास ३. चंद्र नक्षत्र ४. वार ५. तिथी. कांही विद्वान पंचांगाची पाच अंगे अशी मानतात – १. तिथी २. वार ३. नक्षत्र ४. योग आणि ५. करण.

वैदिक तत्वज्ञानानुसार तीन सनातन सत्ता आहेत – पहिली ईश्वर/ परमेश्वर/ परमात्मा/ ब्रह्म/ परब्रह्म, दूसरी आत्मा/ जीवात्मा आणि तिसरी प्रकृती/ माया !!! त्याचा बरोबर काळ आणि दिशा/ देश/ अंतरिक्ष (टाईम आणि स्पेस) यांना सुद्धा अत्यंत महत्वाच्या संकल्पना मानल्या जातात.

वैदिक खगोलशास्त्राचा इतिहास अत्यंत प्राचीन असा आहे. या शास्त्राची मूळे वैदिक संस्कृती पर्यंत घेऊन जातात. वैदिक साहित्यातील ऋग्वेद कांड १०, सुक्त ८५ मंत्र १८, कांड १०, सुक्त ८५ मंत्र १९, यजुर्वेद अध्याय १३ मंत्र २५, अध्याय १४ मंत्र ६, अध्याय १४ मंत्र १५, अध्याय १४ मंत्र २७, अध्याय १५ मंत्र ५७, अथर्ववेद कांड ३ सुक्त १० मंत्र १०, तैत्तरीय संहिता अध्याय ४ मंत्र ११ मध्ये खगोल विषयक चिंतन प्राप्त होते.

वैदिक मंत्रांच्या संपादनासाठी विशिष्ट काळाला जाणण्यासाठी वेदाच्या सहाव्या अंगाची म्हणजेच ज्योतिषाची आवश्यकता भासते. दिवस, रात्र, सप्ताह, पक्ष, मास (महीना), ऋतू, नक्षत्र, वर्ष इ. चे ज्ञान ज्योतिष या वेदांगाशिवाय होऊ शकत नाही. याचा जीवनाशी एवढा संबंध आहे की आपण अजाणतेपणेच आपण 'रात्र' 'दिवस' – यांसारख्या ज्योतिष विषयक शब्दांचा वापर करत असतो. वैदिक संहितांमध्येच काळाच्या अनेक विभागांचे वर्णन उपलब्ध होते. ऋतुंच्या नावांवरून वर्षाचा बोध होत असे. उदाहरणार्थ – शरदः शतम् (शंभर वर्षे ) सुपरिचित 'वर्ष' सुद्धा वर्षा ऋतूच्या नावावरच निर्माण झालेले आहे. 'वसन्ते ब्राह्मणोऽग्निमादधीत, ग्रीष्मे राजन्य आदधीत, शरदि आधी' (ते० प्रा० १।१।१ ) तथा 'प्रातः जुहोति, सायं जुहोति' ( ते० प्रा० २ । १ । २ ) इ.

या परंपरेतील प्रथम स्वतंत्र ग्रंथ महर्षी लगध रचित 'वेदाङ्ग ज्योतिष' शीर्षक ग्रंथ आहे, जो ऋग्वेद आणि यजुर्वेदाशी संबंधित आहे. यामध्ये श्लोकांच्या


माध्यमातून तात्कालिक ज्योतिषविद्याचे का वर्णन केलेले आहे. 'आर्च ज्योतिष' – ऋग्वेद संबंधी ३६ श्लोक आणि 'याजुष ज्योतिष' – यजुर्वेद संबंधी ४३ श्लोक युक्त ग्रंथ आहे. यांनतर मयासुर नावाच्या विद्वानाचा महत्वपूर्ण ग्रंथ 'सूर्यसिद्धांत' दृष्टिक्षेपात येतो. इसवी सनाच्या ४०० वर्षांपूर्वी ग्रीक किंवा यवन खगोलशास्त्राचे अध्ययन सुरु झाले. या अध्ययनाचा प्रभाव निश्चितच झाला. ग्रीक ग्रंथाच्या संस्कृत अनुवाद 'यवन जातक' आणि 'रोमाका सिद्धांत' या ग्रंथांच्या रूपाने दिसून येतात.

आर्यभट्ट रचित 'आर्यभटीय' हा ग्रंथ अत्यंत महत्वाचा ग्रंथ आहे. ब्रह्मगुप्त यांनी 'ब्रह्मगुप्त सिद्धांत', वराहमिहिर यांनी 'सूर्यसिद्धांत', भास्कराचार्य प्रथम यांनी 'महाभास्कर', 'लघुभास्कर' आणि 'आर्यभटीय भाष्य' शीर्षक तीन ग्रंथांची रचना केलेली आहे. लल्लाचार्य यांनी 'शिष्याधिविद्या', भास्कराचार्य द्वितीय यांनी 'सिद्धांत शिरोमणी', 'करण कौतूहल' यांसारख्या ग्रंथांची रचना केली. अन्य आचार्यांमध्ये श्रीपती, महेंद्र सूरी, नीलकंठ, सोमय्या, अच्युत इत्यादींचा समावेश होतो. मध्ययुगात अब्दुल रहीम खानाखाना यांनी 'खेटकौतुकजातकम' आणि गागाभट्ट यांनी 'समयनय:' सारख्या ग्रंथांची रचना केलेली आहे. 'वेदाङ्ग ज्योतिष', 'सूर्यसिद्धांत' आणि 'आर्यभट्टीय' या ग्रंथानुसार खालील नकाशाद्वारे प्राचीन वैदिक खगोलशास्त्रातील कांही संकल्पनांचे विवेचन करणे क्रमप्राप्त आहे.


**वैदिक दिनदर्शिका**

सायन पंचांगाधारित चांद्रमास एकसंवत्सर ११४७


खगोलीय कालचक्र





**(साभार सौजन्य स्रोत :- वैदिक दिनदर्शिका – पंचांग आधार – श्री मोहन कृति आर्ष पत्रकम्)**




(साभार सौजन्य स्रोत :- वैदिक दिनदर्शिका – पंचांग आधार – श्री मोहन कृति आर्ष पत्रकम् )




(साभार सौजन्य स्रोत :- वैदिक दिनदर्शिका – पंचांग आधार – श्री मोहन कृति आर्ष पत्रकम्)




**(साभार सौजन्य स्रोत :- पंचांग क्रांती – लेखक आचार्य दार्शनेय लोकेश, मुखपृष्ठ )**




**(साभार सौजन्य स्रोत :- पंचांग क्रांती – लेखक आचार्य दार्शनेय लोकेश, मलपृष्ठ)**

**ऋतु :-** वसन्त, ग्रीष्म, वर्षा, हेमन्त, शरद, शिशिर

**वैदिक मास :-** मधु, माधव, शुक्र, शुचि, नभस्, नभस्य, इष, ऊर्ज, सहस्, सहस्य, तपस्, तपस्य


**नक्षत्र** :- पूर्वाभाद्रपदा, उत्तराभाद्रपदा, रेवती, अश्विनी, भरणी, कृत्तिका, रोहिणी, मृगशीर्ष, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वा फाल्गुनी, उत्तरा फाल्गुनी, हस्त, चित्रा, स्वाति, विशाखा, अनुराधा, ज्येष्ठा, मूल, पूर्वाषाढा, उत्तराषाढा, **अभिजित्**, श्रवण, धनिष्ठा आणि शतभिषक् (शततारका). यापैकी अभिजित नक्षत्राचे अस्तित्व सुद्धा स्वीकार केले पाहिजे. जे फलित ज्योतिष मानणारे स्वीकार करीत नाहीत. वरील २७ नक्षत्रांशिवाय ध्रुव आणि सप्तर्षी म्हणजेच भारद्वाज, वशिष्ठ (+अरुंधती), गोतम, कश्यप, अत्री, विश्वामित्र आणि जमदग्नी नावाच्या तारे यांचा उल्लेख होतो. या नक्षत्र आणि तारे यांच्या स्थितीनुसार रामायण आणि महाभारत यांसारख्या ऐतिहासिक महाकाव्यांचा काल निर्धारण करता येतो. कारण या दोन्ही ग्रंथामध्ये या नक्षत्र आणि तारे याच्या अवस्थेचे वर्णन करण्यात आलेले आहे. तसेच वैवस्वत मनु यांचा कालावधी सुद्धा सिद्ध करता येऊ शकतो.

आंध्र प्रदेशातील वडलूरू येथील स्वामी ब्रह्मानंद सरस्वती यांच्या मतानुसार, " जर कोणी म्हणत असेल की सर्व नक्षत्र १३ अंश आणि २० कला म्हणजेच अमान अंतरावर आहेत, तर सत्य हे आहे की त्याने आपल्या संपूर्ण आयुष्यात कधी ही नक्षत्र पाहिलेलीच नाहीत. अशा व्यक्तीबरोबर नक्षत्रांविषयी संवाद करणे म्हणजे अबोध मुलाबरोबर वेदार्थ संबंधी चर्चा करण्यासारखे, अमावस्येच्या मध्यरात्रीच्या वेळी सूर्य शोधण्यासारखे किंवा ज्येष्ठ महिन्याच्या भर दुपारी आकाशात ध्रुव तारा शोधण्यासारखे आहे. " (श्री मोहन कृति आर्ष पत्रकम्, वर्ष शक संवत २०८१-८२, पृष्ठ क्र. ९ )

**चान्द्र मास :-** चैत्र (चित्रा), वैशाख (विशाखा), ज्येष्ठ (ज्येष्ठा), आषाढ (आषाढा), श्रावण (श्रवण), भाद्रपद (भाद्रपदा), अश्विन (अश्विनी), कार्तिक (कृत्तिका), मार्गशीर्ष / अग्रहायन (मृगशीर्ष), पौष (पुष्य), माघ (मघा), फाल्गुन (फाल्गुनी)

वरील विवेचनानुसार असा निष्कर्ष काढता येतो की भारतीय ज्ञान परंपरेमध्ये वैदिक खगोलशास्त्राचे महत्व निर्विवाद आहे. प्रत्येक भारतीयाने या वैदिक खगोलशास्त्राचे अध्ययन करून योग्य वेळी आपले सण साजरे करावीत. तसेच फलित ज्योतिषाऐवजी गणित ज्योतिषाचा अधिक प्रचार-प्रसार करावा.

***




एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स
गोकुळवाडी, संभाजीपेठ
छत्रपती संभाजीनगर- ४३१००१
मो. ९४२१३०००३६, ९९७००६७९७१
Web- www.educationaldp.in

ISBN: 978-93-48216-66-3